## प्रेसनोट दि. १३/११/२०१७

## खूनाच्या प्रयत्नातील गुन्हयातील दोन आरोपींना गुन्हे शाखा, युनिट १ ने केली अटक

दिनांक १३/११/२०१७ रोजी गुन्हे शाखा, युनिट १ कडील अधिकारी व स्टाफ असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री नितीन भोसले पाटील यांचे सुचनाप्रमाणे फरासखाना पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलींग फिरत असताना, पो.ना. तुषार खडके व पो.हवा. रिजवान जिनेडी यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, फरासखाना पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या खूनाच्या प्रयत्नातील गुन्हयातील पाहिजे असलेले आरोपी नामे **अभिषेक विकास रानवडे, वय २५ वर्षे, रा ६२१ नारायण पेठ, पुणे** हा पवळे चौक येथे मित्रासह गप्पा मारित उभे असलेचे बातमी मिळालेने, सदर बातमी मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री नितीन भोसले पाटील यांना कळवून त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे १ कडील स्टाफने लागलीच सदर ठिकाणी जावुन, इसमास ताब्यात घेतले.

त्यास विश्वासात घेवून त्याचेकडे दाखल गुन्हयाबाबत विचारणा केली असता, जखमी इमस व आरोपी हे एकमेकांचे मित्र असून दारू पिण्याच्या किरकोळ वादावरून त्यांच्यामध्ये दिनांक १२/११/२०१७ रोजी रात्रौ ९.१५ वा चे सुमारास भांडणे झालेमुळे वरील नमुद इसम, केतन कुदळे व त्यांचा मित्र प्रविण महाजन यांनी मिळून जखमी इसमाच्या डोक्यात दगड घालून, त्यास जिवे मारण्याचा प्रयत्न केला आहे म्हणून फरासखाना पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३४६/२०१७ भादविक. ३०७,३२३,३४ अन्वये गुन्हा दाखल आहे. नमुद इसमास पुढील कारवाई कामी फरासखाना पोलीस सअेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.

तसेच दाखल गुन्हयामध्ये फरारी झालेला **दुसरा इसम केतन राजेंद्र कुदळे, वय २६ वर्षे, रा. ८२१/२२ बुधवार पेठ, विष्णूपुरावाडा, पुणे** याचा ही शोध घेत असताना तो नदीपात्रामध्ये मिळुन आलेने, त्यास ही वरील स्टाफने ताब्यात घेवून, त्यास वरील गुन्हयामध्ये पुढील कारवाई कामी फरासखाना पोलीस स्टेशन कडे वर्ग करण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख सो. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक हर्षल कदम, स.पो.फौज. राजाराम सुर्वे, पो.हवा. रिजवान जिनेडी, पो.ना. तुषार खडके, इरफान मोमीन, श्रीकांत वाघवले, इफ्रान शेख, सचिन जाधव, पो.हवा. राजू पवार, प्रकाश लोखंडे, महेबुब मोकाशी, अशोक माने, उमेश काटे, सुभाष पिंगळे, प्रशांत गायकवाड, गजानन सोनुने, मोहन येलपले, यांनी केली आहे.